# व्यक्ती-वल्ली - कथाकथन सम्राज्ञी: गिरिजा कीर

कथा, कादंबरी, मुलाखती, प्रवासवर्णने व बालसाहित्य अशा वैविध्यपूर्ण मराठी साहित्य क्षेत्रात मानाचं स्थान मिळविणारी, शंभर पेक्षा अधिक पुस्तकं प्रकाशित झालेली, हजाराहून अधिक कथाकथन करणारी, अनुराधा मासिकाचं संपादन करणारी व सामाजिक प्रश्नांसंबंधीच्या प्रेमापोटी कामगार वस्ती, कुष्ठरोग्यांची वस्ती, आदिवासी भागात जाऊन त्यांच्या जीवनाचा जवळून अभ्यास करणारी व जन्मठेप झालेल्या येरवडा तुरुंगवासी कैद्यांच्या सहवासात जाऊन त्यांच्या जीवनाचे जवळून संशोधन अभ्यास करणारी एकमेव व्यक्ती म्हणजे, सुप्रसिद्ध लेखिका आणि उत्कृष्ट कथाकथनकार गिरिजा कीर. माझं भाग्य असं की, प्रथम रमा मुदवेडकर व नंतर गिरिजा कीर म्हणून मी तिला माझ्या लहानपणापासून ओळखतो. गिरिजा ही रुईया कॉलेजमध्ये माझ्या वडिलांची (प्रा. व्ही. एच. कुळकर्णी) विद्यार्थिनी व माझ्या थोरल्या बहिणीची (इरावतीची) मैत्रिण होती. सरांकडे म्हणून गिरिजाने जो आमच्या घरात प्रथम प्रवेश केला तो स्नेह व नातं कायम स्वरूपात राहिलं. त्याला कारणीभूत होती आमची तीर्थरूप आई. पहिल्याच क्षणी आईने तिला आपली दुसरी मुलगी मानली होती. 'माझ्या आयुष्याची गोष्ट' या आत्मचरित्रात गिरिजाने लिहिलंय, "*वि. ह. कुळकर्णी सरांकडे मी जोडले गेले ते तर सरांमुळे किंवा इरावतीमुळे नव्हे, तर आईमुळं. आई जर एव्हढं प्रेम देणाऱ्या नसत्या तर मी त्या घरची कधी झालीच नसते. ही आई वेगळी होती. म्हणूनच आईवेगळ्या त्या घरानं बांधून ठेवलं..!*"






***१) गिरिजा कीरच्या विक्रमी १५००व्या कथाकथनाच्या कार्यक्रमाचे न्यू यॉर्क महाराष्ट्र मंडळाने आयोजित केलेल्याचे पत्रक... २) मंडळाचे अध्यक्ष विवेक बेंद्रे यांच्या हस्ते गिरीजाचा झालेला सत्कार व गौरव... ३) मंडळानी गौरवलेला 'कथाकथन सम्राज्ञी' हा गिरीजाला माझ्या हस्ते दिला गेलेला सन्मानित किताब-गौरव चिन्ह...***

नागपूर वृत्तांतात नुकतंच माझ्या वाचनात आलं होतं, ८४ अखिल भारतीय मराठी साहित्य

संमेलनाच्या अध्यक्षपदाची उमेदवारी मागे घेण्यासाठी 'गिरिजा कीर यांना जिवे मारण्याची धमकी' देण्यात आली होती. हे विधान गिरिजानी विदर्भ साहित्य संघात आयोजित पत्रकारांशी वार्तालाप करताना केलं होतं. मंडळी, नोकरी सोडून लिखाणाला प्राधान्य देणाऱ्या गिरीजाने आपल्या आयुष्याची ४८ वर्ष साहित्य सेवेला वाहून घेत १०० च्यावर पुस्तके आणि २,००० च्यावर कथाकथनाचे कार्यक्रम करून ४५ च्यावर पुरस्कार पटकावले. असे एकामागून एक विक्रम करणाऱ्या गिरिजाला कारण नसतांना मान-अपमानालाही सामोरं जावं लागलं होतं. तसेच, आतापर्यंत तिने केलेले लिखाण, सामाजिक कार्य, व वैचारिक मंथन हे बाजूलाच राहिलं. हे फक्त सुसंकृत विचारवंत जाणतील.

गिरिजा कीर म्हटलं की, एक यशस्वी लेखिका व प्रसिद्ध कथाकथनकार म्हणून रसिक वाचकांच्या मनात स्थान मिळवून आहे. याचा 'श्री गणेशा' होण्याआधी गिरीजा ही एक अत्यंत हुशार व कलाकार होती. गिरिजाने नाटकातून भूमिका केल्या होत्या. आणि या पार्श्वभूमीतून व सुप्त कलेतून साहित्याची गोडी निर्माण झालेल्या गिरिजाने त्या क्षेत्रात यशस्वीपणे साम्राज्य मिळवलं हे निश्चित भूषणावह व अभिमानास्पद आहे. बहुतेक कथाकथनकार हे दुसऱ्यांच्या कथेवर किंवा गोष्टींवर कथाकथन करणारे होते. गिरिजाने मात्र जे कथाकथन केले ते स्वतः लिहिलेल्या कथेवर केले होते किंवा करीत होती. हे तिचे खास वैशिष्ट्य होते. अशा या गिरिजाने जसं साहित्य क्षेत्रात एकामागोमाग विक्रम केले तसेच, कथाकथनातही केले. या तिच्या गुणांमुळे श्रोत्यांना सुरुवातीपासूनच आपलंसं करून त्यांची नाळ ओळखून कथेत किंवा गोष्टीत गुंतवून ठेवण्याची ताकद व संवाद साधण्याची कला तिला अवगत होती. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून गिरिजाने कथाकथने केलीत. मग, एक दिवस गिरिजाने अमेरिकेत भरारी मारली. न्यू यॉर्कच्या महाराष्ट्र मंडळाने तिच्या कथाकथनाचा रेकॉर्डब्रेकिंग १५०० वा कार्यक्रम, क्वीन्सच्या हिंदू टेंपलच्या सभागृहात आयोजित केला होता. या विक्रमीत कार्यक्रमात गिरीजाला 'कथाकथन सम्राज्ञी' हा गौरवपर सन्मानीत किताब बहाल केला होता. या यशस्वी कार्यक्रमाला खूप गर्दी झाली होती व रसिक प्रेक्षकांनी त्याचे उत्फुर्तपणे स्वागत केले होते. तसेच, इतरही ठिकाणी गिरिजाचे अनेक कार्यक्रम झाले होते. याआधी अमेरिकेत भारतीय कलाकारांचे असंख्य कार्यक्रम झाले होते. परंतु, कथाकथनाचा असा हा पहिला-पहिलाच कार्यक्रम झाला होता. हे विशेष होय. तेव्हा गिरिजाचा मुक्काम आमच्याकडे होता. या तिच्या दौऱ्यात न्यू यॉर्क महाराष्ट्र मंडळ व न्यू जर्सीच्या मराठी विश्वतर्फे एक सहल आयोजित करण्यात आली होती. आणि तेथे एका मोकळ्या पार्कमध्ये गिरिजाच्या कथाकथनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. मला व गिरीजाला ते खटकले होते. मग, तिथे न जाता आम्ही गिरिजाला अटलांटिक सिटीला घेऊन गेलो होतो. डोळ्याचं पारणं फिटेल अशीच ती जुगारी स्वप्न नगरी. ती पाहून गिरिजाला मनस्वी आनंद झाला होता. म्हणाली, *'अरे जयंता, बरं झालं आपण सहलीला गेलो नाही. हा एक वेगळा अनुभव मला आयुष्यात पाहायला मिळाला नसता. तुमचे शतशः आभार..!'*



***१) अमेरिकेच्या दौऱ्यातील गिरीजा... २) मुंबईतील भेटीत गिरिजा व मी... ३) अटलांटिक सिटीच्या स्वप्ननगरीत वीणा, माझा मुलगा सलील व गिरीजा...***

अटलांटिक सिटीला गेल्यावर त्या जुगाराची स्वप्ननगरी पाहिल्यावर गिरिजा म्हणाली, '*खिश्यात पैसे नसले तरी आपण श्रीमंत नगरीत वावरतोय हे समाधानच अतिश्रीमंत आहे. जयंता, मी मात्र दहा डॉलर्स खेळणार आहे. दहा डॉलर्सचे दशलक्ष कसे होतील या भावनेने ध्येय ठेवूनच मी खेळणार आहे. या सर्वांचा मी मनसोक्त आस्वाद घेणार आहे. जीवाची अमेरिका करायची आहे. चुकून जर मी करोडपती झाले तर, आपण सर्वजण जगाची सफर करूया...*' गाडीत आम्ही जुनी गाणी ऐकत होतो. एक गाणं ऐकल्यावर गिरिजा म्हणाली, '*हे कोरगावकर (श्रेष्ठ संगीतकार दत्ता कोरगावकर-के. दत्ता) साहेबांचं गाणं नां, मी त्यांना बऱ्याच वर्ष्यापूर्वी भेटले होते. त्यांची दिलखुलास प्रदीर्घ मुलाखत घेतली होती...*' मी चपापलो व म्हणालो, '*अग, मग तो मुलाखत मला वाचायला मिळेल कां..?*' '*नाही, अजून ती प्रकाशित झाली नाहीये...*' हे ऐकतांच मला खटकलं होतं. परंतु, गिरिजाचा मोकळा, मानी व स्पष्ट स्वभाव मला माहीत होता. एका अर्थी तिचं म्हणणं बरोबरही होतं. त्यामळे मी वाद घातला नव्हता. पण, माझ्या नशिबाने दत्ता कोरगावकरांच्या मुलीने पुस्तकरूपाने प्रकाशित झालेली ती मुलखात मला भेट दिली होती. असो.




***१) अमेरिकेतील अनुभवांवर मुलाखतवजा लिहिलेलं 'पश्चिमगंध' पुस्तक... २) सुप्रसिद्ध लेखक, कवी, नाटककार व रंगदोपचे पहिले संपादक श्री. विजय पाठारे यांच्या हस्ते 'पश्चिमगंध' या पुस्तकाचे अमेरिकेत, न्यू जर्सीमध्ये झालेले प्रकाशन... ३) या जाहीर समारंभात भाषण करतांना गिरीजा व रसिक प्रेक्षकवर्ग...***

एकंदरीत, गिरिजचा हा पहिलाच दौरा यशस्वी झाला होता. साहित्यिक असल्याने या तिच्या दौऱ्यात, गिरिजाने अंनेकांच्या भेटी घेऊन मुलाखतीही घेतला होत्या. पुढे भारतात गेल्यावर अनेक विषयांसह विविध क्षेत्रातील व्यक्ती भेटल्याने गिरिजाने त्या अनुभवांवर 'पश्चिमगंध' नांवाचे पुस्तक प्रसिद्ध केले होते. पहिला दौरा यशस्वी झाल्यानंतर गिरिजाने अमेरिकेचा दुसरा दौरा केला होता. त्या दौऱ्यात तिने लिहिलेल्या 'पश्चिमगंध' या पुस्तकाचे औपचारिक प्रकाशन सुप्रसिद्ध साहित्यिक, कवी, नाटककार व संपादक श्री. विजय पाठारे यांच्या घरी मोठ्या दिमाखात करण्यात आले होते. दृष्ट लागण्यासारख्या या सोहळ्याला अनेकांनी हजेरी लावली होती, भाषणे झाली होती. जे पाहिलं, टिपलं व अनुभवलं त्या अविस्मरणीय आठवणींचा जणू सुगंध त्या 'पश्चिमगंध' पुस्तकात दरवळत होता...

गिरिजा ही अत्यंत प्रेमळ व निगर्वी स्वभावाची. आमच्या कुटुंबावर भयंकर लोभ. आम्ही कधीही भारत भेटीला गेलो की, 'जयंता, या मुक्कामात आमच्यासाठी एक दिवस ठेव. भेटल्याशिवाय-जेवल्याशिवाय जायचं नाही. आम्हाला वेळ नसला तर, वेळात वेळ काढून गिरिजा स्वतः भेटायला आली नाही असं कधीही झालं नाही. तिचा खर्चिक, अगत्यशील स्वभाव, आत्मीयता व साक्षेप वाखाणण्यासारखा आहे. भेटीला येतांना आमच्यासाठी भरपूर खाद्य पदार्थ व भेट वस्तू घेऊन येत असे. त्या शिवाय, प्रकाशित झालेली पुस्तकं बरोबर असत. परतीच्या विमान प्रवासात बहुतेक तो वाचली जात होती. कपाळाला मोठं कुंकू (तिचा ट्रेड मार्क), कपड्याच्या बाबतीत टापटीप, तसंच त्याची रंगसंगत, सदैव आनंदी व हंसरा चेहरा या सर्व गोष्टी गिरीजाला शोभून दिसतात. बालमोहन विद्यामंदिर शाळेचे माजी विश्वस्त व मुख्याधापक बापू रेगे सरांची मोठी मुलगी शुभदा ही गिरिजाची सून. त्यामुळे साहित्यिक व शैक्षणिक क्षेत्राचे वातावरण त्या बांद्र्याच्या साहित्य सहवासातील रहात्या घरी आहे. शिवाय बाजूला गंगाधर गाडगीळ, वरती रा. भि. जोशी व समोर विंदा करंदीकर असं साहित्यिक योग्य वातावरण तेथे असे. साहित्यिक क्षेत्रात गिरिजाचे अनेक मान सन्मान व गौरव झाले. तिला असंख्य पारितोषिके मिळालीत. त्यात अनेक विक्रमही केले. ही गिरीजाची खरी आर्थिक पुंजी असं ती अभिमानाने म्हणते.







*१) एक दुर्मिळ फोटो. बसलेले डावीकडून: टी. के. जोशी, माझे वडील प्रा. वि. कुळकर्णी व कवी श्री. व सौ. प्रफुल्लदत्त. मागे: डॉ. व सौ. डॉ. विठ्ठल प्रभू, गिरीजा व पती उमाकांत कीर...*
*२) गिरिजाच्या अमृत महोत्सवी वर्ष गौरव समारंभात अध्यक्ष मधू मंगेश कर्णिक, प्रमुख वक्ते विद्याधर पानट व गिरीजा... ३) त्या समारंभात गिरीजा, दिवाकर-दादा कारखानीस व गिरिजाचे पती उमाकांत कीर...*

म्हणतात, कथाकथन एक कला आहे, एक अस्सल व जिवंत अनुभव आहे. कथाकथन ही कलाच मुळी नृत्य-संगीतारमाणे 'जिवंत कला'- Living Art आहे. कथाकथन करताना कथा निवेदकाला ती कथा, त्यावेळी विशिष्ट गोष्टींचे साहाय्य घेऊन जिवंत करावी लागते. त्यासाठी कथा निवेदकला ती 'अनुभवावी' लागते. हे अनुभवपणे तेव्हाच घडते, जेव्हा त्या विषयी अतीव आस्था असते. मला वाटतं गिरिजा मुळातच उत्तम लेखका असल्याने तिने या कलेत साम्राज्य मिळवलं. म्हणूनच, अमेरिकेत मराठी समाजाने तिला 'कथाकथन सम्राज्ञी' हा किताब बहाल केला होता. पूर्वी सामूहिक कथाकथनं होत असत. परंतु, एकट्याने कथाकथन करणे फार कठीण आहे. दुर्दैवाने आज कथाकथनं होत नाहीत. ती कला लुप्त झाली आहे. कदाचित, तसे दर्जेदार लेखक व ऐकणाऱ्या रसिक प्रेक्षकांचे प्रमाण कमी झाले आहे. मात्र, या कलेत कथाकथनकार म्हणून गिरिजाचे नांव कायमचे स्मरणात राहाणार आहे.
असो.

गिरिजाने कथा, कादंबऱ्या, व्यक्तिचत्रे, प्रवासानुभव व ललित लेखन केलं ते बहुअंशी वाचकांशी केलेला अथवा साधलेला सुसंवादच आहे. तसेच, गोष्टीवेल्हाळ शैलीत केलेलं कथाकथनही एक प्रकारचा थेट संवादच असे. यजमान उमाकांत यांची साथ ही गिरिजाला प्रेरणादायक होती. ते गेल्यानंतर झालेलं दुःख व आजारपणं यांनी गिरिजाची शारीरिक परिस्थिती खालावली आहे. मात्र, दोन गुणी मुलं व सुना तिची उत्तम काळजी घेताहेत. हा मानसिक आधार व सेवा फार मौलिक आहे. गिरीजाला ८५ वर्ष पुरी होताहेत. बाहेर जरी जाणं कमी झालंय तरी तिचं लिखाण थांबणारं नाही याची मला कल्पना आहे. त्यासाठी गिरिजाला उत्तम आरोग्य लाभो अशी मी सदिच्छा व्यक्त करतो..!

**जयंत विठ्ठल कुळकर्णी.**
न्यू यॉर्क, अमेरिका.
jvkny1@gmali.com

**ता. क:** न्यू यॉर्क व न्यू जर्सीच्या महाराष्ट्र मंडळातर्फे १९९१ मध्ये प्रकाशित झालेला पहिला 'रंगदीप' दिवाळी अंक हातात पडल्यावर गिरिजाने तत्परतेने लिहिलेला सविस्तर व वाचनीय अभिप्राय एक नमुना व साक्षेप म्हणून सोबत देत आहे.
जयंत.

॥ श्री ॥

सौ. गिरिजा कीर

५ अपूर्वा, साहित्य सहवास, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१. दूरध्वनी : ६४२९८८२

२२-१-१९९२.

श्री. जयन्त,

सप्रेम नमस्कार.

तुम्ही आवर्जून पाठवलेला "रंगदीप"चा देखणा अंक मिळाला. आभार! ही अनपेक्षित भेट निश्चितच आनंददायक वाटली.

खरं सांगू, परदेशात रहाणारे भारतीय जेव्हा एखादी साहित्यकृती किंवा कलाकृती घेऊन समोर येतात तेव्हा त्या गोष्टीकडे निव्वळ टीकाकाराच्या (किंवा समीक्षकाच्या) नजरेनं पहाताच येत नाही. या अंकाच्या बाबतीतही तसंच आहे.

भारतापासून दूरवर रहाणाऱ्या तुमच्यासारख्या देशबांधवांनी भारतीयत्वाची भावना जपणं, मातृभाषेचं प्रेम ~~जपणं~~ जोपासणं याचं मोल मला फार मोठं वाटतं. "मराठी" या एका प्रेमाच्या धाग्यानं आपण जोडले आहोत. तेव्हा तुम्हा मंडळींच्या साहित्यकृतीकडे मी लेखक, "साहित्य" म्हणून न पहाता एक "कृती" म्हणून पहाते — तीही प्रेमापोटी जन्मलेली.

तुमच्या "रंगदीप"चं बाह्यरूप निःसंशय देखणं आहे. मुखपृष्ठ, मांडणी, छपाई, कागद या सर्वच गोष्टी आकर्षक आहेत. मुखपृष्ठाची सजावट तर बोलकी अन् कल्पकही आहे.

प्रथम मी "वाटचाल" वाचली. त्यातून मला तुमची मनो—भूमिका कळली. अंक चाळला. तोही बरा वाटला. तुम्हा सर्वांचे श्रम अन् निर्मितीचं प्रेम जाणवलं. विविध तऱ्हेच्या लेखनातून तुमच्या विचारांची आणि चिंतनाचीही दिशा कळली. (शुद्धलेखनाकडे पूर्ण ~~दुर्लक्ष~~ दुर्लक्ष करून) ज्या साहित्यानं माझं लक्ष विशेष वेधून घेतलं त्याचा उल्लेख करते—

"कथा कुणाच्या!"... "आमची मराठी मिरास" "झाकले माणिक"
"डाकिणीचे डोळे"
"संघर्ष" (ले. सौ. मिनू बोडस यांच्या कविता. (तरी दैववादी कवितेची बाजू अधिक होती वाटली. ती आवश्यक व्हायला हवी.) सजावट उत्कृष्ट वाटली.

हा अंक वाचताना काही सुचवावंसं वाटतं —

1) अशा अंकात भारतातल्या, (इथल्या) लेखकांच्या साहित्यकृतींचा समावेश करावा. (आमचं जगणं, आमच्या समस्या, आमच्या विवंचना, आमचे हर्षामर्ष तुमच्यापर्यंत पोचायला हवेत.)

2) तुमच्या जीवनातल्या जाणिवा, उणिवा आणि नेणिवा यांचं निर्भय दर्शन घडायला हवं.

3) निवडून येणारा भारतीय हा आमदाराला कुटुंबातला विजय असतो. आणि तुम्ही या मातीशी समरस होऊ शकत नाही. हे खरं का? सेतू बांधता येईल का? निदान वैचारिक — भावनिक!

मला जे जाणवलं ते लिहिलं. तिथल्या अमराठी वातावरणात, हे मनाचं कौतुक तुम्ही मंडळी जपता आहात त्याकरता शाबासकीची थाप देते आहे. तुम्ही मोठे व्हा, यशवन्त व्हा आणि त्याबरोबरच तुम्हाला "आपलं" म्हणणाऱ्या इथल्या आतल्या हाकेची आठवण ठेवा!

तिथल्या सर्व मराठी बंधु-भगिनींना माझे प्रेमपूर्वक नमस्कार.

कळावे.

जय-हिंद!

स्नेह.

गिरिजा

(सौ. गिरिजा कीर.)

पुनश्च: सोबत छायाचित्र. पाठवलं तर वापरा. सगळ्या छायाचित्रांत तेच आहे. कुणी ओळखीचे येणार असल्यास कळवा. माझी पुस्तकं भेटीदाखल पाठवते.

---

ज्येष्ठ लेखिका गिरिजा कीर यांचं निधन

https://maharashtratimes.com/maharashtra/mumbai-news/marathi-writer-girija-keer-passed-away/articleshow/71839984.cms